# 7.काळ

संपर्क
8329588625

WWW.OSDEPO.COM Telegram Group Join https://t.me/OOacademy

# 7.काळ

**लक्षात ठेवा**

- **पुढील वाक्ये वाचा व अधोरेखित क्रियापदे नीट पाहा:**

**(1) राणी अभ्यास करते.**

**(2) राणीने अभ्यास केला.**

**(3) राणी अभ्यास करील.**

**'करते, केला, करील' या तिन्ही क्रियापदांमध्ये करण्याची क्रिया आहे; परंतु ती घडण्याची वेळ निरनिराळी आहे.**

# 7.काळ

**(1) करते - या क्रियापदावरून क्रिया आता घडते हे समजते.**

**(2) केला - या क्रियापदावरून क्रिया पूर्वी घडली हे समजते.**

**(3) करील - या क्रियापदावरून क्रिया पुढे घडेल हे समजते.**

**क्रियापदावरून क्रिया केव्हा घडली याचा जो बोध होतो, त्यास काळ म्हणतात.**

**मुख्य काळ तीन आहेत:**

(1) वर्तमानकाळ

(2) भूतकाळ

(3) भविष्यकाळ.

क्रिया चालू असते, तेव्हा क्रियापद 'वर्तमानकाळी' असते.
क्रिया पूर्वी झालेली असते,तेव्हा क्रियापद 'भूतकाळी' असते.
क्रिया पुढे व्हायची असते, तेव्हा क्रियापद 'भविष्यकाळी' असते.

**म्हणून, (1) राणी अभ्यास करते. - वर्तमानकाळ.**

**(2) राणीने अभ्यास केला. - भूतकाळ.**

**(3) राणी अभ्यास करील. - भविष्यकाळ.**

# 7.काळ

**उदाहरण: ‘हसणे’ या क्रियापदाची तीनही काळांतील एकवचनी व अनेकवचनी रूपे पाहा:**

| सर्वनाम | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| मी | हसतो | हसलो | हसेन |
| आम्ही | हसतो | हसलो | हसू |
| तू | हसतोस | हसलास | हसशील |
| तुम्ही | हसता | हसलात | हसाल |
| तो (महेश) | हसतो | हसलो | हसेल |

# 7.काळ

संपर्क
8329588625

| सर्वनाम | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| ती (अमृता) | हसते | हसली | हसेल |
| ते (एकवचन) (मूल) | हसते | हसले | हसेल |
| ते (अनेकवचन) (मुलगे) | हसतात | हसले | हसतील |
| त्या (बाई) | हसतात | हसल्या | हसतील |
| ती (अनेकवचन) (माणसे) | हसतात | हसली | हसतील |

## पुढील वाक्यातील क्रियापदाचे योग्य भूतकाळी रूप कोणते?

**(1)'स्वच्छ भारत' हे सर्वांचे स्वप्न पूर्ण होईल.**

(1) झाले (2) झाले आहेत

(3) होते (4) होऊ दे.

**(2) पुढीलपैकी वर्तमानकाळी क्रियापद कोणते ?**

(1) बसत असे (2) बसत असतो

(3) बसला (4) बसला होता.

संपर्क
8329588625

**(3) 'मी यश मिळवणार,' या वाक्याचा काळ ओळखा**

(1) वर्तमानकाळ (2) भूतकाळ

(3) भविष्यकाळ (4) साधा काळ.

# 7.काळ

**प्रश्न 1. पुढीलपैकी वर्तमानकाळी वाक्यांच्या पर्याय-क्रमांकांची वर्तुळे रंगवा :**

1) (1) मी माझे पुस्तक उघडले होते. (2) मी माझे पुस्तक उघडते.
(3) मी माझे पुस्तक उघडीन. (4) मी माझे पुस्तक उघडले.

2) (1) आई गोष्ट सांगेल. (2) आईने गोष्ट सांगितली होती.
(3) आई गोष्ट सांगत असते. (4) आईने गोष्ट सांगितली.

# 7.काळ

संपर्क
8329588625

3) (1) ताईने चित्र रेखाटले. (2) ताई चित्र रेखाटत असेल.
(3) ताई चित्र रेखाटेल. (4) ताई चित्र रेखाटते.

4) (1) सविता मुंबईला जाते. (2) सविता मुंबईला गेली.
(3) सविता मुंबईला जाईल. (4) सविता मुंबईला गेली होती.

5) (1) मी स्पर्धेत भाग घेतला आहे. (2) मी स्पर्धेत भाग घेणार.
(3) मी स्पर्धेत भाग घेतला होता. (4) मी स्पर्धेत भाग घेतला.

4) (1) मला नाटक पाहायला आवडते. (2) मला नाटक पाहायला आवडेल.
(3) मी नाटक पाहिले. (4) मी नाटक पाहणार आहे.

5) (1) बाई कवितेला चाल लावतात.
(2) बाई कवितेला चाल लावतील
(3) बाईंनी कवितेला चाल लावली असेल.
(4) बाईंनी कवितेला चाल लावली

# 7.काळ

**प्रश्न 2. पुढीलपैकी भूतकाळी वाक्यांच्या पर्याय-क्रमांकांची वर्तुळे रंगवा :**

1) (1) माझ्या यशाने सर्वजण सुखावतील. (2) माझ्या यशाने सर्वजण सुखावले आहेत.
(3) माझ्या यशाने सर्वजण सुखावतात. (4) माझ्या यशाने सर्वजण सखावले

2) (1) मामाने पुण्यात बंगला बांधला. (2) मामा पुण्यात बंगला बांधतो.
(3) मामा पुण्यात बंगला बांधेल. (4) मामाने पुण्यात बंगला बांधला आहे.

3) (1) अतुल सुरेख खेळ करील. (2) अतुल सुरेख खेळ करीत असतो.
(3) अतुल सुरेख खेळ करतो. (4) अतुलने सुरेख खेळ केला.

संपर्क
8329588625

**प्रश्न 3. पुढीलपैकी भविष्यकाळी वाक्याच्या पर्याय-क्रमांकाचे वर्तुळ रंगवा :**

(1) (1) आम्ही केशवसुतांची 'तुतारी' ही कविता तालासुरात गायली.
(2) आम्ही केशवसुतांची 'तुतारी' ही कविता तालासुरात गातो.
(3) आम्ही केशवसुतांची 'तुतारी' ही कविता तालासुरात गाऊ.
(4) आम्ही केशवसुतांची 'तुतारी' ही कविता तालासुरात गात असतो.

(2) (1) मुलांनी बागेची सफाई केली.

(2) मुले बागेची सफाई करीत असतील.

(3) मुलांनी बागेची सफाई केली होती.

(4) मुले बागेची सफाई करतात.

(3) (1) आईने सर्वांना खाऊ वाटला.

(2) आई सर्वांना खाऊ वाटत होती.

(3) आई सर्वांना खाऊ वाटप करील.

(4) आई सर्वांना खाऊ वाटत असते.

संपर्क
8329588625

(4) (1) आम्ही क्रिकेट खेळलो.
(2) आम्ही क्रिकेट खेळलो.
(3) आम्ही क्रिकेट खेळू.
(4) आम्ही क्रिकेट खेळत असू.

(5) (1) सुरेखा गाणे गात असेल.
(2) सुरेखा गाणे गाते.
(3) सुरेखा गाणे गात असते.
(4) सुरेखाने गाणे गायले.

# 7.काळ

**प्रश्न 4. पुढील प्रत्येक प्रश्नात दिलेल्या काळाचे योग्य क्रियापद असणाऱ्या पर्याय-क्रमांकाचे वर्तुळ रंगवा**

(1) भूतकाळ : (1) उठतो (2) उठला (3) उठेल (4) उठत असतो.

(2) वर्तमानकाळ :(1) जिंकते (2) जिंकले (3) जिंकू (4) जिंकेन.

(3) भविष्यकाळ :(1) गेला (2) जातो (3) जाईन (4) गेला होता.

(4) भूतकाळ: (1) गडगडते (2) गडगडेल (3) गडगडत आहे (4) गडगडले.

(5) भविष्यकाळ :(1) सुटला (2) सुटत आहे (3) सुटेल (4) सुटला होता.

**प्रश्न 5. पुढील प्रत्येकासाठी उत्तर म्हणून योग्य पर्याय-क्रमांकाचे वर्तुळ रंगवा :**

**(1) 'संग्रामने धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.' या वाक्याचा काळ ओळखा.**

**(1) वर्तमानकाळ**
**(2) भूतकाळ**
**(3) भविष्यकाळ**
**(4) साधा काळ.**

संपर्क
8329588625

**(2) पुढीलपैकी भूतकाळी नसणारे वाक्य निवडा :**

**(1) मी दररोज व्यायाम करीन.**

**(2) संतोष मामाच्या गावाला गेला.**

**(3) सकाळीच वडील कामावर गेले.**

**(4) आम्ही सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली होती.**

**3) 'कविता मंडईतून बाजार आणते.' या वाक्याचे भूतकाळी वाक्य पर्यायांतून निवडा:**

**(1) कविता मंडईतून बाजार आणत असते.**

**(2) कविता मंडईतून बाजार आणेल.**

**(3) कविताने मंडईतून बाजार आणला आहे.**

**(4) कविता मंडईतून बाजार आणत असे.**

संपर्क
8329588625

**(4) अब्दुलने आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. (काळ ओळखा)**

(1) वर्तमानकाळ

(2) भूतकाळ

(3) भविष्यकाळ

(4) साधा काळ

WWW.OSDEPO.COM Telegram Group Join https://t.me/OOacademy

संपर्क
8329588625

**(5) पुढे दिलेल्या वाक्यातील काळ ओळखा :**

**'खेळणी तयार करायला बुरडाघरच्या कांबट्या आणाव्या लागायच्या.'**

**(1) वर्तमानकाळ**

**(2) साधा काळ**

**(3) भूतकाळ**

**(4) भविष्यकाळ.**


2023 -2024
स्कॉलरशिप परीक्षा
ADMISSION OPEN 2023-2024
Online batch
संपूर्ण विषयाची तयारी
Basic to Advance
क्लास Live+Recorded
जुन्या प्रश्न पत्रिका सराव
Free Doubt Session
विद्यार्थी / पालक मार्गदर्शन
Call Us On
8329588625
Download OOACADEMY PUNE App


Thank you!